Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ४३ ] गुरुवार, नोव्हेंबर ६, २०२५/कार्तिक १५, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ६२.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक—अ-अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६१४.

**मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये**

**जाहिर सूचना**

ज्याअर्थी. मा. प्रशासक, नगर परिषद, उमरखेड यांचा दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजीचा ठराव क्र. ५०७ अन्वये उमरखेड शहराचे मंजूर विकास योजनेमध्ये किरकोळ फेरबदल करण्याचे निश्चित झाले आहे. आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार विकास योजनेमध्ये फेरबदल करण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मुख्याधिकारी यांना प्रदान केले आहे.

**अधिसूचना**

क्रमांक नपउ-निवि-४६०-२०२५.—

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये उमरखेड शहराच्या मंजूर विकास योजनेत किरकोळ बदल करणेबाबत महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचे क्रमांक टीपीस-२७१८-१७६३-सी.आर. १६५-२०१८-भागशः मंजुरी-नवि-३०, दिनांक २ डिसेंबर, २०२१ अन्वये मंजूर झाली असून दिनांक ०५ मे, २०२२ पासून अमंलात आली आहे.

नगर परिषद उमरखेडने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) च्या तरतुदीप्रमाणे खाली दर्शविल्याप्रमाणे किरकोळ फेरबदल करण्याचे ठरविले आहे.

**किरकोळ फेरबदल**

उमरखेड नगर परिषद हद्दीतील मौजा उमरखेड खंड क्र. ०२ मधील शेत स. नं २६८/१/अ चे क्षेत्र १.४१ हे. आर आणि शेत स. नं २६८/१/ब चे क्षेत्र १.३२ हे. आर एकूण क्षेत्र २.७३ हे. आर ही जागा कृषी विभाग वापरातून वगळून सदर जमीन

वापर बदलून रहिवासी विभागामध्ये समाविष्ट करण्यासाठी किरकोळ फेरबदल करण्याचे ठरविले आहे.

वरील किरकोळ फेरबदल दर्शविणारा नकाशा नगर परिषद, उमरखेड या कार्यालयात कार्यालयीन वेळेत लोकांना अवलोकन करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात येत आहे. वरील फेरबदलाबाबत हरकती अथवा सूचना नागरिकांनी महाराष्ट्र राज्य शासनाचे राजपत्रात सदर्हु नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत मुख्याधिकारी, नगर परिषद , उमरखेड यांचेकडे दाखल कराव्यात म्हणजे शासनाकडे वरील फेरबदलाचा प्रस्ताव मंजुरी करीता पाठविण्यापूर्वी आलेल्या हरकती अथवा सूचना यांचा विचार केला जाईल.

**डॉ. अजय कुरवाडे,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, उमरखेड.

उमरखेड :
दिनांक ३ नोव्हेंबर, २०२५.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६१५.

## BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Under Section 37 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

PUBLIC NOTICE

As per the proposal approved by the Chief Officer, Nagar Parishad, Umarkhed Resolution No. 507, dated 31st October, 2025 for modification in the Development Plan, and according to the powers delegated under Section 37*(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, all powers related to execution of the Development Plan are vested with the Chief Officer of the concerned Municipal Council.

Therefore, as per the direction of Dr. Ajay Kurwade, Chief Officer, Nagar Parishad, Umarkhed, the following order is issued.-

*NOTIFICATION*

No.MCW-.PD.-460-2025.–

The Development Plan of Umarkhed has been sanctioned by Government Urban Development Department No.TPS-2718-1763-CR-165-2018-Part Sanction-UD-30, dated 2nd December, 2021 and came into force from 5th May, 2022.

Accordingly, the proposal for modification in the Sanctioned Development Plan of Umarkhed Nagar Parishad is as follows.-

**MINOR- MODIFICATION**

The land in Umarkhed Municipal Council limit in Mouja Umarkhed khand 02, in Survey No. 268/1/A having Area 1.41 Hectare and in Survey No. 268/1/B having Area 1.32 Hectare, total area 2.73 Hectare in Agricultural Zone be converted into Residential Zone.

The part plan of Development Plan showing the above minor modification is kept open for public inspection during office hours in the office of Municipal Council, Umarkhed.

The objections and suggestions in respect of above proposed modification have to be sent in writing to the Chief Officer, Municipal Council, Umarkhed within 30 days from the date of publication of this notice in the *Maharashtra Government Gazette.*

The suggestions or objections received within time would be considered before submitting the proposal to the Government for sanction.

Dr. AJAY KURWADE,
Chief Officer,
Municipal Council, Umarkhed.

Umarkhed :
Dated the 3rd November, 2025.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६१६.

**मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये**
**अचलपूर शहराची ( मूळ हद्द-दुसरी सुधारित) प्रारुप विकास योजनेचे प्रसिध्दीकरण**

**सूचना**

क्रमांक नपअ-नर-वि.यो.-कलम-२६-५९४४-२०२५.—

ज्याअर्थी, अचलपूर नगरपरिषदेने ( यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे "उक्त क्षेत्र" असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेली), चे कलम २१(२) चे अनुषंगाने कलम २३ (१) व ३८ मधील तरतुदीनुसार प्रारुप विकास योजना, (यापुढे "उक्त योजना" असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. १५, दि. २१ जुलै, २०२३ त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभागीय पुरवणी भाग-१-अ(असाधारण) दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ मध्ये प्रसिध्द केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरुन अचलपूर नगर परिषदेने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, शाखा अमरावती यांची नगर रचना अधिकारी म्हणून आदेश क्र. २९६८/२०२३, दि. २५ ऑगष्ट, २०२३ अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, नगर रचनाकार, शाखा यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारुप विकास योजना तयार करुन ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता प्रसिध्द करण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र. ०१, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२५ रोजी पारित केलेला आहे;

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारुप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये नागरिकांकडून सूचना/ हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.-

१. मुख्याधिकारी, अचलपूर, नगरपरिषद, अचलपूर.

२. सहायक संचालक, नगर रचना, शाखा अमरावती, अमरावती.

उक्त प्रारुप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, नगरपरिषद, अचलपूर यांचेकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत नगरपरिषदेकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशीलाच्या प्रती योग्य शुल्क आकारुन नगरपरिषद कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

**धीरजकुमार वि. गोहाड,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर.

अचलपूरः
दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ६१७.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Publication of Draft Development Plan of Achalpur Municipal Council (Original Limit-2nd Revision) Under Section 26*(1)* of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

*NOTICE*

No.MCA-TP-D.P.-Section-26-5944-2025.–

Whereas, the Municipal Council, Achalpur *vide* Resolution No. 15, Dated 21$^{st}$ July, 2023 had declared its intention to prepare a Draft Development Plan of Achalpur Municipal Council (Original Limit- 2$^{nd}$ Revision) for the area under its jurisdiction, as per the provision of section 38 & 23*(1)* read with section 21*(2)* of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette Amravati Division, Supplement Part-1A (Extra Ordinary) on 14$^{th}$ August, 2023;

And whereas, as per the provision in section 24 of the said Act, the Municipal Council *vide* Order No. 2968/2023, dated 25$^{th}$ of August 2023, has appointed Assistant Director, Town Planning, Amravati Branch, Amravati as "Town Planning Officer" to prepare the said Draft Development Plan for the said area;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning, Amravati Branch, Amravati after having prepared Existing Land Use Map as per section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the said Planning Authority on Dated 31$^{st}$ October, 2025 for publication under section 26*(1)* of the said Act;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 01, dated 03$^{rd}$ November, 2025 to publish the said Draft Development Plan under section 26*(1)* of the said Act, for inviting suggestions/ objections from the public;

Therefore, Achalpur Municipal Council hereby publishes the said Draft Development Plan along with the Report under section 26*(1)* of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.-

1. The Chief Officer, Municipal Council, Achalpur.
2. Assistant Director, Town Planning, Amravati Branch, Amravati.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief Officer, Municipal Council, Achalpur within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette.* Suggestions/objections received by the Municipal Council within the period of the 30 days from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Achalpur Municipal Council.

DHIRAJKUMAR V. GOHAD,
Chief Officer,
Municipal Council, Achalpur.

Achalpur :
Dated the 04$^{th}$ November, 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.